# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५

---

**महामंडळात “समन्वयक” हे पद कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित. गोरेगांव (पू.), मुंबई - ६५ |
| २ | पदनाम व पदसंख्या | “समन्वयक” |
| ३ | अर्हता | महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. या महामंडळातील वरिष्ठ सहाय्यक या पदावरून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी |
| ४ | पदाचे स्वरुप व कालावधी | ११ महिने |
| ५ | सविस्तर जाहिरात व अर्ज उपलब्धतेचे ठिकाण | www.filmcitymumbai.org |
| ६ | अर्ज पाठविण्याचे ठिकाण | filmcitycao@gmail.com |
| ७ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.१२.०६.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ८ | निवड पध्दत | मुलाखतीद्वारे |
| अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी शर्ती यांचा तपशील www.filmcitymumbai. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा, अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. | | |

स्वाक्षरी/

व्यवस्थापकीय संचालक

म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

## महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

### “समन्वयक” या पदासाठी सविस्तर जाहिरात.

महामंडळाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र.गोचिन-२००९/प्र.क्र.१११/सां.का.१, दि.३०.०९.२००९ अन्वये २४९ पदांचा आकृतिबंध मंजूर केला आहे. यापैकी १८ पदे व्यपगत झाल्याने २३१ पदे मंजूर असून सद्यस्थितीत विविध सवंर्गातील फक्त ५५ पदे कार्यरत असून १७६ पदे रिक्त आहेत. कार्यरत पदांमध्ये बहुतांश कर्मचारी चतुर्थ श्रेणीतील व तांत्रिक स्वरुपाचे काम करणारे आहेत. तसेच कार्यरत असलेल्या कर्मचारी नियतवयोमानुसार सेवा निवृत्त होत असल्याने दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे.

याकरीता महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. या महामंडळातील वरिष्ठ सहाय्यक या पदावरून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचेकडून मा.संचालक मंडळाचा ठराव क्र.१५४/९, दि.२२.१०.२०२० अन्वये मुलाखतीद्वारे ११ महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

| क्र. | पदाचे नाव | पद संख्या | अर्हता | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | “समन्वयक” | १ | महामंडळातील वरिष्ठ सहाय्यक या पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी | • विधानमंडळ संबंधित कामकाज<br>• सार्वजनिक उपक्रम समिती संदर्भातील कामकाज<br>• शासनाशी संबंधित कामकाज.<br>• बिंदुनामावली तयार करणे व त्यास शासनाची मान्यता घेणे.<br>• प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे सेवा पुस्तक अद्ययावत करणे.<br>• महामंडळातील कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल गुणांकन करुन उत्कृष्ट कर्मचारी ठरविणे.<br>• महामंडळातील पद भरतीचे काम करणे.<br>• महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पदोन्नती संबंधित काम .<br>• आश्वासित प्रगती योजने विषयक काम.<br>• नाट्यगृह योजना संबंधित काम.<br>• ५० / ५५ बाबत पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही.<br>• प्रशासन विभागामधील सेवा पुस्तके व अन्य कामांबाबत मार्गदर्शन करणे.<br>• वरिष्ठांनी वेळोवेळी सुचविलेली इतर कामे. |

**१. अर्हता:-** अ) महामंडळातील जानेवारी २०२६ ते मे २०२६ या कालावधीत सेवा निवृत्त झालेले अधिकारी.

ब) शारीरिक व बौध्दिकदृष्ट्या कार्यक्षम असणे आवश्यक.

क) मराठी, हिंदी आणि इंग्रजी लिहिण्या व वाचण्याची क्षमता आवश्यक.

ड) कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी झालेली, प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

२. **वित्तलब्धी :-** नियमानुसार

३. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या (उदा. सेवानिवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र) साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑनलाईन दि.१२.०६.२०२६ सायंकाळी ५ वाजे पर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,<br>
व्यवस्थापकीय संचालक<br>
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

## “समन्वयक” या पदासाठी अर्जाचा नमुना :-

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | अर्ज करत असलेल्या पदाचे नाव | |
| ३ | जन्म तारीख | |
| ४ | पत्रव्यवहारासाठीचा पत्ता | |
| ५ | ई-मेल | |
| ६ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | |
| ८ | सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी | |
| ९ | निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी | |
| १० | सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ११ | विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १२ | सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी